# समिती दर्पण

नोव्हेंबर - डिसेंबर २०२२

**विद्यार्थी साहाय्यक समिती** : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org

### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पाहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्चशिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहे. त्यात ७५० विद्यार्थी- विद्यार्थिनींची निवास- भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# विद्यार्थ्यांना मिळाला उद्योजकतेचा मंत्र

## उद्योजक परिषदेत यशस्वी माजी विद्यार्थ्यांचे अनुभवकथन





ग्रामीण भागातील पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या मुलांची भोजन- निवासाची व्यवस्था करून त्यांचा सर्वांगिण विकास करत त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, हे विद्यार्थी साहाय्यक समितीचे ध्येय. पण करिअर आणि नोकऱ्या यांचे स्वरुप दिवसेंदिवस बदलत आहे आणि या बदलाला अनुसरुनच समितीने आता विद्यार्थ्यांना उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन देण्यावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचीच सुरुवात म्हणून २५ डिसेंबरला समिती उद्योजक परिषद आयोजित करण्यात आली होती.

समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रांतर्गत पहिल्यांदाच आयोजित केलेल्या या परिषदेला उद्योजक म्हणून यशस्वी झालेले समितीचे ९० माजी विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, प्राज इंडस्ट्रिजचे प्रमोद चौधरी यांनी दृकश्राव्य पद्धतीने परिषदेत सहभागी होत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात मनीषा गोसावी (लावण्य स्पा), मंदार जोगळेकर (मायविश्व टेक्नॉलॉजी, बुकगंगा), डॉ. हरिश पाटणकर (केशायुर्वेद, कायायुर्वेद), शंकर बारवे (एसबी प्रॉडक्शन प्रायव्हेट लि.), जे. व्ही. ऊर्फ राजू इंगळे (टेक एक्स्पर्ट इंजिनिअरिंग प्रा. लि.), तुकाराम गायकवाड (गायकवाड एंजरप्रायझेस) या माजी विद्यार्थ्यांनी चित्रफितीच्या माध्यमातून आपल्या उद्योगातील यशस्वी वाटचालीचे सादरीकरण करत सुमारे ५० आजी विद्यार्थ्यांना उद्योजकतेचा मंत्र दिला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय मानसिकता तयार करण्यासाठी येत्या तीन वर्षांत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची रुपरेषा सुरेश उमाप यांनी सांगितली.

सुप्रिया केळवकर यांनी प्रस्तावनेत परिषद आयोजनामागचा उद्देश स्पष्ट केला. ज्योती गोगटे यांनी लिहिलेल्या बडींग आंत्रपेन्युअर आयडिया बुक या पुस्तिकेचे प्रकाशन झाले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी अंगारकी मांडे हिने केले. तुषार रंजनकर यांनी आभार मानले. समितीच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

> युरोपमध्ये सध्या व्यवसायाच्या मोठ्या संधी आहेत. त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नवीन तंत्रज्ञानाचे मोठे आव्हानही आहे. उद्योजकांनी आर्थिक संकटामध्ये परस्परांना मदत केली, तरच सर्व जण तग धरू शकतात. त्यासाठी सीडफंड उभारला पाहिजे.
> – **प्रतापराव पवार**, अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

> संशोधन आणि विकास, नावीन्यपूर्ण कल्पना, खेळते भांडवल, मनुष्यबळ, बाजारातील पत यांची योग्य सांगड घातली तर उद्योग यशस्वी होतो. त्याचबरोबर ईएसजी (एन्व्हायर्नमेंट, सोशल, गव्हर्नन्स) ही उद्योगातील नवीन तत्त्वे आहेत.
> – **प्रमोद चौधरी**, प्राज इंडस्ट्रिज

> बदलत्या काळानुसार नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा उद्योग- व्यवसाय करावा, यासाठी विद्यार्थ्यांची मानसिकता तयार करण्याकरता समिती येत्या ३ वर्षांत विविध उपक्रम राबविणार आहे. भविष्यात समितीतून बाहेर पडलेले किमान १० टक्के विद्यार्थी उद्योजक व्हावेत, असा प्रयत्न आहे.
> – **तुकाराम गायकवाड**, कार्यकारी विश्वस्त, वि. सा. समिती

# सामाजिक दायित्व कायदा आणि समिती



**विद्यार्थी साहाय्यक समितीचे बरेचसे आर्थिक नियोजन हे समाजाकडून मिळणाऱ्या देणग्यांवर अवलंबून असते, हे आपण जाणताच. यातील काही देणग्या आपल्याला कॉर्पोरेट क्षेत्रातील विविध कंपन्यांकडून मिळतात. या संदर्भात आपल्याला अधिक माहिती मिळावी, यासाठी हा लेखप्रपंच.**

**प्रदीप मांडके**, टीम सीएसआर, विद्यार्थी साहाय्यक समिती

सामाजिक दायित्व कायदा (CSR- Corporate Social Responsibility) समजावून घ्यायचा तर आधी तो ज्याचा भाग आहे तो कंपनीज् ॲक्ट (Companies Act) काय आहे, ते जाणून घेणे गरजेचे आहे.

### Companies Act 2013 A

भारतातल्या कंपन्या कशा चालाव्यात, याचे निकष सांगणारा कायदा म्हणजेच Companies Act 2013. सन १९५६ मध्ये अस्तित्वात आलेल्या या कायद्यात सन २०१३ मध्ये काही महत्त्वाचे बदल करण्यात आले.त्यातील आपल्या कामाचा बदल म्हणजे Section 135 जो भारतातील उद्योगांची सामाजिक बांधिलकी उधृत करतो. १९६५- ६६ मध्ये उद्योग क्षेत्राची सामाजिक बांधिलकी काय असावी, याबद्दल चर्चेला सुरुवात झाली. सध्या जो कायदा अमलात आला आहे, त्याची पायाभरणी मात्र २००९ मध्ये Ministry of Corporate Affairs (MCA)ने सीएसआर संदर्भात घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांपासून झाली आणि सन २०१३ मध्ये लोकसभा आणि राज्यसभेत संमत झाल्यावर ३० ऑगस्ट २०१३ रोजी हे बदल कायदा म्हणून लागू झाले.

### हा कायदा कोणाला लागू होतो?

- Section 135 अशा कंपन्यांना लागू होतो ज्यांची, एकूण वार्षिक उलाढाल १००० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा अधिक आहे, किंवा
- ज्यांची एकूण मालमत्ता ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे, किंवा
- ज्या कंपनीचा निव्वळ वार्षिक नफा ५ कोटी रुपये किंवा त्यापेक्षा अधिक आहे.

अशा सर्व उद्योगांना त्यांच्या नफ्यातील किमान २ टक्के रक्कम सामाजिक कामांत गुंतवणे सक्तीचे आहे.

सामाजिक कामांसाठी खर्च म्हणजे नक्की कोणत्या प्रकारच्या कामांसाठी खर्च याची यादी शेड्युल सातमध्ये दिलेली आहे.१ एप्रिल २०१४ पासून लागू झालेल्या या शेड्युलमध्ये एकूण ११ विषयांचा समावेश आहे.

१. भूक, गरिबी आणि कुपोषणाचा नायनाट
२. शिक्षण,व्यावसायिक प्रशिक्षण,रोजगाराभिमुख शिक्षण यांचा मुले,महिला,ज्येष्ठ आणि अपंग यांच्यामध्ये प्रसार
३. स्त्रियांच्या हक्कांसाठी,सक्षमीकरणासाठी काम
४. पर्यावरणाशी निगडीत कामे(जसे की, प्राणी,पक्षी,वनस्पती आणि जीवसृष्टीचे रक्षण आणि संवर्धन)
५. राष्ट्रीय वारसा असलेल्या जागा, कला, हस्तकला, संस्कृतीचे रक्षण व संवर्धन
६. सैन्य दलातील पीडीत सैनिक, मृत सैनिकांच्या विधवा आणि इतर अवलंबित कुटुंबीयांसाठी काम
७. ग्रामीण खेळ, तसेच ऑलिंपिक, पॅरा ऑलिंपिक खेळांसाठीचे प्रशिक्षण
८. मागास, भटक्या विमुक्त जमाती, अल्पसंख्यांक आणि महिलांच्या विकासासाठी केंद्र सरकार करत असलेल्या निधी संकलनास,किंवा पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीसाठी (Prime Minister's National Relief Fund) आर्थिक मदत
९. शैक्षणिक संस्थांमधील तंत्रज्ञानाधारीत प्रयोगशाळांसाठी आर्थिक मदत
१०. ग्रामीण विकासाची कामे
११. झोपडपट्टी विकासाची कामे CSR अंतर्गत केलेली कामे वरीलपैकी निकषांवर आधारित असणे बंधनकारक असले, तरी हे काम नक्की कसे करायचे, त्याची व्याप्ती काय असावी, हे कंपन्या ठरवू शकतील, जेणेकरून ही कामे अधिक परिणामकारक पद्धतीने करता येतील.

समितीला खालील कलमांतर्गत मदत मिळू शकते.

- शिक्षण
- स्त्रियांच्या हक्कांसाठी,सक्षमीकरणासाठी काम
- भूक,गरिबी,आणि कुपोषणाचा नायनाट

### आवाहन

कृपया आपण अथवा आपले मित्र, नातेवाईक जर वर वर्णन केलेल्या कंपन्यामध्ये काम करीत असतील तर त्याची माहिती आम्हाला जरूर द्यावी.

**आठवणीचे पान**

## सारिकाचा खारीचा वाटा

सामाजिक संस्थांना काम करताना समाजाच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. तुमचे काम चोख आणि पारदर्शी असेल, तर अनेक हात सोबत येतात. अशा सामाजिक संस्थांसोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची जबाबदारी मोठी असते. तुम्ही शंभर लोकांबरोबर बोललात, तर त्यातील दहा लोकांना तुमचे काम पटेल आणि चार लोक सोबत येतील, अशी स्थिती असते. विद्यार्थी साहाय्यक समितीचा कार्यकर्ता म्हणून काम करताना मी अनेकांशी बोलतो, तसेच माझी भाची सारिका सिसोदे हिच्याशी बोललो होतो. तिचे नरडाणा (ता. शिंदखेडा, जि. धुळे) येथे श्री जोगेश्वरी मेडिकल स्टोअर्स आहे. वाढदिवसाला शुभेच्छा देण्यासाठी फोन किंवा मेसेज करायची माझी सवय आहे. १ जूनला सारिकाचा वाढदिवस असतो. गेल्या वर्षी तिला शुभेच्छा देण्यासाठी फोन केल्यावर, समितीला मोठी नाही, परंतु नियमित देणगी द्यायची इच्छा तिने बोलून दाखवली आणि समितीचे अकाउंट डिटेल्स मागितले. त्या महिन्यापासून न चुकता दर महिन्याला पाचशे रुपये ती समितीला देणगी म्हणून ट्रान्सफर करते. बऱ्याच वेळा काही मोठ्या गोष्टींसाठी किंवा प्रकल्पासाठी भरीव देणग्या येतात, पण त्या एकदा आल्यानंतर पुन्हा येतीलच, याची खात्री नसते. अशा काही सातत्याने येणाऱ्या देणग्यांमुळे रोजचे खर्च भागवणे शक्य होते. संस्थेच्या दृष्टीने खारीचा वाटा असणाऱ्या अशा देणग्याही जास्त मोलाच्या असतात.

– दिनकर वैद्य

शिंपल्यातील मोती



# पायांना बळ आणि गती देणारा समिती परिवार

जीवनात प्रत्येक टप्प्यावर अनेक चढउतार अनुभवले, अनुभवतो आहे, तरीही या भवसागरात टिकून आहे, पुढे जात आहे...! याचे गमक काय असावे, असा प्रश्न मनात येतो, तेव्हा लक्षात येते की, जीवनात अनेक समर्पित संस्थांचा, लोकांचा परिसस्पर्श आपल्याला लाभला आहे. या सर्वांत अग्रभागी आहे विद्यार्थी सहायक समिती...!

समितीत असतानाच रमाकांत तांबोळी सरांच्या दूरदृष्टीमुळे इंदापूरला जाऊन समितीचे माजी विद्यार्थी तुषार रंजनकर सर या उत्साही व तरुण नवउद्योजकासोबत काम करण्याची संधी मिळाली. स्वतः उद्योजक बनण्याची बीजे इथेच कुठेतरी पेरली गेली असावीत.

समितीने प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात जिवाभावाचे मित्र दिले. त्यामुळेच व्हिलचेअरवर बसूनही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन विविध शाळा– संस्थांसाठी गणिताच्या शेकडो कार्यशाळा घेता आल्या. अगदी विदर्भात, गडचिरोलीच्या जंगलातील शाळांमध्येही जाऊन आलो. या प्रवासात पायाला बळ देणारे हरीश बुटले सरांसारखे अनेक वडीलबंधू भेटले. समिती ही आता फक्त संस्था राहिलेली नाही, तो एक भला मोठा परिवार बनला आहे.

विद्यार्थ्यांचा गणिताचा पाया पक्का व्हावा, यासाठी मी कार्यशाळा घेतो. माझी Basics of Arithmetic Algebra आणि Basics of Geometry ही पुस्तके फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील प्रत्येक राज्यात पोचली आहेत. तामिळनाडूपासून काश्मीरपर्यंत व गुजरातपासून अरुणाचल प्रदेशपर्यंत प्रत्येक राज्यातील विद्यार्थी गणित शिकण्यासाठी माझा 'Basics Pattern' उपयोगात आणत आहेत. दोन वर्षांच्या कालावधीत सुमारे ३५ लाखांपेक्षा जास्त किमतीची पुस्तके भारतभरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोचली आहेत. एक गोष्ट नम्रपणे नमूद करावीशी वाटते की, जगभरात 'Basics'da काम करणाऱ्या पहिल्या दहा लोकांच्या यादीत माझे काम नक्की आहे. येत्या काळात पालक व विद्यार्थ्यांसाठी गणित विषयातील समस्या व प्रगतीसाठी रवी वरे हा समानार्थी शब्द बनलेला असेल. जगभरातील विद्यार्थी RV's School of Mathematics च्या माध्यमातून LIVE Online Courses on Basics of Maths चा लाभ घेतील.

या प्रवासात समितीचे संस्कार पावला– पावलावर उपयोगी ठरत आहेत. मी निश्चयपूर्वक, जिद्दीने समिती परिवाराचा प्रतिनिधी म्हणूनच समाजात काम करतो आहे, करणार आहे.

**– रवी वरे,** माजी विद्यार्थी

माझे वाचन

## पुतीन वृत्तीचे दर्शन

**(पुतीन – लेखक : गिरीश कुबेर)**

विसाव्या शतकात झालेली दोन महायुद्धे, त्यानंतर झालेले शीतयुद्ध आणि नंतर १९९१ मध्ये झालेले उदारीकरण, या सर्व या शतकातील महत्त्वाच्या घटना. परंतु दोन महायुद्धांच्या दरम्यान झालेली एक अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे रशियातील समाजवादी क्रांती आणि लेनिनचा उदय. या गोष्टींनी जगामध्ये काही प्रमाणात हालचाल वाढविली आणि प्रस्थापित भांडवलशाही व्यवस्थेला सुरुंग लावला. याच रशियात नंतर जोसेफ स्टॅलिन झाला, जो आपल्या क्रूर राजवटीसाठी ओळखला जातो. परंतु रशियाने स्वीकारलेली समाजवादी व्यवस्था, त्याचे फायदेतोटे आणि फक्त रशियाचा थोडासा सुरुवातीला सोडला तर नंतर फक्त राजकीय लेखाजोखा लेखकाने पुतीन या पुस्तकात घेतला आहे. पुतीन हे १९९९ मध्ये रशियाच्या सर्वोच्चपदी विराजमान झाले आणि आजतागायत ते तिथे आहेत. त्यांच्या काळात झालेल्या निवडणुका, समाजकारण, अर्थव्यवस्था राजकीय व इतर विरोधकांची कुचंबणा आणि त्यांना नेस्तनाबूत करण्याची पुतीन प्रवृत्ती या पुस्तकातून अधोरेखित केली आहे.

**– कृष्णा बागल,** लजपत भवन वसतिगृह

## सुन्न करणारा संघर्ष

**(यसन – लेखक : प्रा. ज्ञानेश्वर जाधवर)**

यसन कादंबरी वाचायला घेतली आणि त्यातच हरवून गेले. प्रा. जाधवर यांनी खूप छान लेखन, शब्दरचना आणि नकळत डोळ्यांच्या कडा ओल्या करून टाकणारे कडूगोड प्रसंग आपल्या निराळ्या शैलीत व्यक्त केले आहेत. काही क्षण मनाची घालमेल करणारे तर काही काळीज सुन्न करणारे. या कादंबरीच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांचे दुःख, कष्ट आणि स्वाभिमानी संघर्ष जाधवर यांनी अचूक शब्दांमध्ये मांडला आहे आणि त्याला वाचा फोडली आहे.

ग्रामीण भागात ऊस तोडणीचे काम करत आयुष्य जगणाऱ्या, गरीबी असलेल्या कुटुंबाची ही कथा आहे. कथेचा नायक वामन आहे. त्या वामनच्या जन्मापासून त्याच्या संपूर्ण आयुष्यात अनेक आव्हाने येतात. तो ही खडतर आव्हाने पेलत, परिस्थितीचे चटके सोसत पुढे जातो. कर्तृत्व घडवायचे असेल, यश मिळवायचे असेल, तर परिस्थिती कधीच आडकाठी म्हणून येत नाही, हा धडा या पुस्तकातून आपल्याला मिळतो. स्वआयुष्याबद्दल तक्रारी असणाऱ्या, नशिबाला, परिस्थितीला दोष देणाऱ्या, नकारात्मक राहणाऱ्या, निराशामय असणाऱ्या प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये एकदा तरी हे पुस्तक अवश्य वाचावे. जगण्याबद्दलची सकारात्मक प्रेरणा मिळाल्याशिवाय राहात नाही. शिक्षण व्यवस्था, त्याचे बाजारीकरण आणि त्यातून गरीबांचे होणारे अमाप शोषण, याचे समर्पक चित्रण कादंबरीत केले आहे.

**– अंगारकी मांडे,** सुमित्रा सदन

समिती वृत्त

## नवप्रवेशित विद्यार्थ्यांना झाली समितीची ओळख



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या आपटे वसतिगृहातील मोडक हॉलमध्ये १२ डिसेंबर रोजी परिचय सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला समितीतील कार्यकर्ते, पर्यवेक्षक, कर्मचारी व तिन्ही वसतिगृहातील नवप्रवेशित विद्यार्थी उपस्थित होते.

सभेची सुरुवात समितीविषयीची चित्रफीत दाखवून करण्यात आली. दिनकर वैद्य यांनी विद्यार्थ्यांना समितीचे कार्यकर्ते व कर्मचारी यांची ओळख करून दिली. तसेच आरोग्यासाठी योगासनाचे महत्त्व आणि आवश्यकता याविषयी माहिती दिली. अभय व्यवहारे यांनी पाल्य– पालक योजना, श्री. हेमंत राजहंस यांनी कमवा– शिका योजनेविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेची भावना निर्माण करण्यासाठीच्या चार तास काम योजनेचे महत्त्व चंद्रकांत कुलकर्णी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मासिक अवलोकन कार्ड कसे भरावे, याविषयी हरीश अष्टेकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी विकास केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती सुप्रियाताई केळवकर यांनी दिली. मयूर हाडवळे, उत्कर्षा दरेकर व अंगारकी मांडे यांनी विद्यार्थी व्यवस्थापनामधील अनुभव सांगितले. नवप्रवेशित विद्यार्थ्यांपैकी प्रशांत कराड, रोहन घोलप व अंशू कुमारी यांनी मनोगत व्यक्त केले. पर्यवेक्षक सौ. संगीता गारवे व कुंदन पठारे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

## समितीच्या स्थापनादिनी अवीट गोडीच्या गीतांनी रंगली मैफल



प्रसिद्ध संगीतकार आणि गायक सुधीर फडके अर्थात बाबूजींनी संगीतबद्ध केलेली आणि काही गायिलेली अवीट गोडीची गीते... ती गात असताना त्या गीतांच्या संदर्भात त्यांचे पुत्र श्रीधर फडके यांनी जागविलेल्या आठवणी, गीतांबरोबर ठेका धरत रसिकांची मिळालेली दाद... आणि या दर्दी रसिक श्रोत्यांकडूनच स्वतः संगीत दिलेल्या ओंकार स्वरुपा या गाण्याचे ध्रुवपद म्हणून घेत श्रीधरजींनी रंगविलेली मैफल...

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या स्थापनादिनानिमित्त साहाय्यदाते, हितचिंतक आणि स्नेहीजनांसाठी सुश्राव्य मैफिलीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी प्रसिद्ध गायक– संगीतकार श्रीधर फडके यांचा 'बाबूजी आणि मी' हा भावगीत आणि भक्तीगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रसिद्ध गीतकार ग. दि. माडगूळकर यांचे पुत्र आनंद माडगूळकर या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

बाबूजी तसेच स्वतः श्रीधर फडके यांनी स्वरबद्ध केलेली गीते यावेळी सादर करण्यात आली. श्रीधर फडके यांच्यासह शिल्पा पुणतांबेकर, शेफाली कुलकर्णी यांनी गायिलेल्या गीतांनी ही मैफल उत्तरोत्तर रंगत गेली. या कार्यक्रमातील विशेष म्हणजे समितीच्या माजी विद्यार्थिनी, यंदाच्या साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कवयित्री डॉ. संगीता बर्वे यांची डोळे जसे कधी कधी, ही श्रीधर फडके यांनी संगीतबद्ध केलेली कविता यावेळी सादर करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्तविक सुप्रिया केळवकर यांनी केले. समितीच्या वतीने देणगीदार नितीन कारिआ यांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. प्रायोजक क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्स प्रा. लि. चे भूषण वाणी यांना सन्मानित करण्यात आले. समितीचे माजी विद्यार्थी चित्रकार राजेंद्र घोडके यांनी स्वतः काढलेले सुधीर फडके यांचे पोट्रेट श्रीधर फडके यांना भेट दिले.

## वार्षिक दिनदर्शिका प्रकाशित

दरवर्षीप्रमाणेच यंदाही विद्यार्थी साहाय्यक समितीची वार्षिक दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली आहे. यात इंग्रजी महिने, तारखा, मराठी महिने, तिथी, सणवार, महत्त्वाच्या व्यक्तींचे वाढदिवस, जयंती– पुण्यतिथी याबरोबरच दिनदर्शिकेच्या मागील पानांवर समितीच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली आहे. या दिनदर्शिकेच्या ग्लेझ्ड पेपरवर ४ हजार प्रती छापण्यात आल्या असून त्याचा खर्च जाहिरातींच्या उत्पन्नातून करण्यात आला आहे. जाहिराती मिळविण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचे विशेष सहकार्य लाभले. समितीचे साहाय्यदाते, समितीशी संबंधित सर्व घटक, माजी व आजी विद्यार्थी यांना ही दिनदर्शिका भेट स्वरुपात देण्यात येत आहे.





## समितीच्या कार्यालयाला राजाभाऊ पटवर्धन यांचे नाव

अनंत विश्वनाथ ऊर्फ राजाभाऊ पटवर्धन यांनी संरक्षण खात्यातील सहायक लेखा अधिकारी पदावरून निवृत्त झाल्यानंतर विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामात झोकून दिले. सन १९८१ पासून २००४ पर्यंत कार्यकारी विश्वस्तपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. वयाच्या नव्वदीपर्यंत त्यांनी समितीला वेळ दिला. राजाभाऊ पटवर्धन यांच्या या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृहातील तळमजल्यावरील कार्यालयाला त्यांचे नाव देण्यात आले. या कार्यक्रमाला पटवर्धन यांचे कुटुंबीय आवर्जून उपस्थित होते.

## निसर्ग पर्यटनाबरोबरच गवसला माहितीचा खजिना

दरवर्षीप्रमाणे यंदा १६ व १७ डिसेंबरला व्यवस्थापन सहलीचे आयोजन करण्यात आले होते. समितीच्या वसतिगृहांमधील एकूण ४७ विद्यार्थी व २ कर्मचारी या सहलीत सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी प्रथम रत्नागिरीतील थिबा राजवाडा व प्रादेशिक पुरातत्व वस्तुसंग्रहालयाला भेट दिली. कोकणचा जांबा दगड, ब्रह्मदेशाचे बर्माटिक व ब्रिटिशांचे स्थापत्यशास्त्र याचा सुरेख संगम येथे पहावयास मिळाला. विद्यार्थ्यांनी थिबा राजाच्या ३० वर्षीय ब्रिटिश नजरकैदेचा इतिहास जाणून घेतला. गणपतीपुळे येथे गणेशाकडे सर्वांनी निरोगी आयुष्याची कामना केली. त्यानंतर जिंदल उद्योग समुहाने उभारलेल्या जयविनायक मंदिराला भेट दिली. मुक्कामाच्या ठिकाणी जाताना दोन ठिकाणी (जयगड ते तवसाळ व दाभोळ ते धोपावे) फेरी बोटीमध्ये बसण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. मुक्कामाची व जेवणाची व्यवस्था लोकमान्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, चिखलगाव (लोकसाधना परिवार) येथे करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी न्याहारी करून संस्थेचा पर्यावरणपूरक परिसर व त्यात विद्यार्थ्यांच्या कौशल्यात्मक विकासासाठी राबवले जाणारे उपक्रम व अभ्यासक्रम यांची माहिती घेतली. संस्थेचे विश्वस्त कैवल्य दांडेकर यांना समितीची माहिती पुस्तिका देऊन आभार व्यक्त केले. त्यानंतर कर्दे समुद्रकिनारी हिरवा डोंगर, गर्द झाडी व समुद्राच्या लाटा याचा विद्यार्थ्यांनी भरघोस आनंद लुटला.

## रोटरी क्लब,पुणे प्राईडतर्फे विद्यार्थ्यांची मोफत तपासणी

**पुणे :** विद्यार्थी साहाय्यक समितीच्या डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृह (मुलींचे), सुमित्रा सदन (मुलींचे) व लजपतराय विद्यार्थी भवन (मुलांचे) या तीन वसतिगृहातील ६६१ विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईडच्या पुढाकाराने खास समितीच्या विद्यार्थ्यांसाठी दंत, नेत्र, हिमोग्लोबिन आणि तंदुरुस्ती तपासणी शिबीर आणि जागृतीपर व्याख्यानाचे आयोजन केले होते.

डॉ. नितीन कोलते, डॉ. मंजूश्री कुलकर्णी, डॉ. आकांक्षा बत्रा, डॉ. अनिकेत कासोदेकर, डॉ. सायली केले– वाणी, डॉ. भक्ती कासोदेकर, डॉ. हेमंत जाधव, डॉ. सागरिका बसवराज या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सलग तीन शनिवार हे शिबीर घेण्यात आले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, विश्वस्त सुप्रिया केळवकर, राजेंद्र ततार, रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईडचे अध्यक्ष उज्ज्वल केले, कम्युनिटी डायरेक्टर अतुल परचुरे आदी उपस्थित होते.

> बहुतांश विद्यार्थी– विद्यार्थिनी ग्रामीण भागातून आलेले असल्याने त्यांना या शिबिराचा लाभ झाला. समितीच्या विद्यार्थ्यांना आरोग्यदायी जेवण मिळत असल्याने तसेच नियमित तपासणी होत असल्याने त्यांचे आरोग्य चांगले असल्याचे आढळले. आरोग्यासाठी पोषक वातावरण समितीमध्ये दिले जात असल्याबाबत डॉक्टरांनीही समाधान व्यक्त केले.
>
> **– उज्ज्वल केले,** अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड

